## यु एस के फाउंडेशन तर्फे "सावित्रीच्या लेकींचा" सन्मान

यु एस के फाउंडेशनतर्फे सावित्रीबाई फुले जयंती निमीत्त आज सावित्रीच्या लेकींचा सन्मान करण्यात आला. स्त्री शिक्षण आणि स्त्री सबलीकरणाच्या क्षेत्रात भरीव कामगिरी करत असलेल्या मात्र प्रसिदधीपासुन दुर राहणा-या महीलांशी या निमीत्ताने यु एस के फाउंडेशनने संवाद साधला व त्यांचा सन्मान केला .

मावळातील आजीवली स्थित बबाबाई लायगुडे निरक्षर विधवा . परीसरात माध्यमिक सोय नव्हती आणि आजीवली माध्यमिक विदयालय झाले होते. तेव्हापासुन आजपर्यंत बबाबाई परीसरातील मुलींना आजीवली येथे शिकण्यासाठी प्रात्साहन देतात .

त्यांच्या निवासाची सोय स्वताच्या घरात विनामुल्य करतात . आजवर त्यांनी ४0 मुलींना असे सुशिक्षित केले असुन त्यांना स्वतःला ३ मुली आहेत .

नांदगाव मुळशी स्थित कुसूम सोनवणे दुसरी पास . आज ६७ वर्षांच्या दलित महीला. गेली ३0 वर्षाहुन आधिक काळ गरीब डोंगरी संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्या म्हणुन सक्रीय. विशेषतः ग्रामिण ,दुर्गम भागातील विधवा ,परित्यकतांचे प्रश्न सोडवुन त्यांना सक्षम करण्यावर कुसुम मावशींचा कटाक्ष .

यु एस के फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा डॉ उषा काकडे यांच्या हस्ते या महीलांचा रोख पुरस्कार व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला

त्यावेळी मनोगत व्यकत करताना डॉ उषा काकडे म्हणाल्या .

आदरणीय सावित्रीबाई फुले यांची आज १८७ वी जयंती. कैक वर्षापुर्वी स्त्री शिक्षणाचा झेंडा रोवणा-या सावित्रीबाई. आज इतकया वर्षांनी स्त्रीला जो सन्मान मिळाला त्यांचे संपुर्ण श्रेय सावित्रीबाई आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या पुरोगामी विचारसरणीला जाते . त्यानंतर र.धो.कर्वे यांच्यासारख्या समाजधुरीणांनी हा विचार पुढे नेला .व ख-या अर्थाने स्त्री सबलीकरण झाले

मात्र आजच्या युगातील सावित्रीला तिच्या लेकींसाठी अजुन एक वसा घ्यावा लागणार आहे तो म्हणजे स्त्री सुरक्षेचा. नाचत बागडत शाळेला जाणारी तिची लेक ...आजही ... शाळेच्या मार्गावर आणि क्वचित शाळेच्या प्रांगणातही असुरक्षित झाली आहे. आता सावित्रीबाईचा आदर्श मानणा-या आपणा सर्वांची ही जबाबदारी आहे ती तिच्या -माझ्या समस्त लेकींची सुरक्षा बघणे.शारीरीक ... मानसिक ...भावनिक पाातळीवर सुरक्षित असलेली स्त्री सुशिक्षित होईल .निर्भयतेने करिअर साठी जगात भरारी घेईल .